

डॉ. मंदाकिनी व डॉ. प्रकाश आमटे यांना एआयबीडीएफ'तर्फे गोंदण पुरस्कार जाहीर

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष ३रे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक 29/03/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 68 || RNI - MAHMAR51259 || metrocity924@gmail.com


# अर्थसंकल्पामध्ये पाचशे कोटींची तरतूद -अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**बारामती : शेतीच्या व्यवसायात बरोबर इतर अनेक क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाणार आहे, शासनाने यासाठी विचारपूर्वक निर्णय घेऊन या वेळी अर्थसंकल्पा मध्ये पाचशे कोटींची तरतूद करण्यात आली आहे, आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शेती व्यवसायातील विविध समस्या सोडविण्यासाठी या पुढील काळात कृत्रिम तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.**



बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या अश्वरूढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळाच्या अनावरण समारंभ कार्यक्रमा नंतर शेतकरी मेळाव्यात पुण्याचे पालकमंत्री अजित पवार बोलत होते, बारामती तालुक्यातील माळेगाव येथील शिवतीर्थ मंगल कार्यालय येथे झालेल्या या मेळाव्याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार ) पक्षाचे तालुकाध्यक्ष राजवर्धन शिंदे, माळेगाव कारखान्याचे अध्यक्ष केशवराव जगताप, उपाध्यक्ष राजेंद्र ढवान पाटील, अशोक पाटील, माजी अध्यक्ष बाळासाहेब तावरे, विश्वासराव देवकाते, संभाजी होळकर, सोमेश्वर साखर कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत काटे, रणजीत तावरे,दत्तात्रय येळे, बारामती बँकेचे अध्यक्ष सचिन सातव आदी मान्यवर उपस्थित होते.

अजित पवार आपल्या भाषणात बोलताना म्हणाले, " महाराष्ट्र राज्याचा सात लाख वीस हजार कोटीचा अर्थसंकल्प नुकताच सादर करण्यात आला असून या अर्थसंकल्पामुळे राज्यामध्ये आर्थिक शिस्त लावण्याचाआम्ही विचार घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, आणि मी अर्थमंत्री म्हणून मी प्रयत्न करीत आहे, राज्यातील शेतकरी, उद्योग,आरोग्य, रोजगार,शिक्षण त्यासाठी हा अर्थसंकल्प विचारपूर्वक मांडला असून वास्तववादी व्यवहारातून योग्य भूमिका घेऊन राज्याच्या विकासावर परिणाम करणाऱ्या ठरेल, " असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गुढीपाडवा आणि रमजान ईद च्या शुभेच्छा देत श्री. पवार आपल्या भाषणात पुढे म्हणाले," १९८४ साली तात्कालीन राष्ट्रपती ग्यानी झेलसिंग यांच्या हस्ते माळेगाव मधील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते, या पुतळ्याची काळजी आणि देखभाल लक्षात घेऊनच आता या नवीन पुतळ्याच्या अनावरण समारंभ घेण्यात आला आहे, आम्ही राज्यातील १३ कोटी जनतेचा विचार करून राज्य शासन निर्णय घेतो, ३१ मार्च अगोदर पीक कर्जाचे हप्ते शेतकऱ्यांनी भरावेत, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

# राज्यातील महामार्गावर महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई :- चौथ्या महिला धोरणात महिलांसाठी आरोग्य आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करण्याबाबत अधिक प्राधान्य देण्यात येणार आहे. यानुसार महामार्गावर प्रत्येक २५ किलो मीटर अंतरावर सुसज्ज स्वच्छतागृह बांधण्यात येणार आहेत. या स्वच्छतागृहांचे देखभाल व व्यवस्थापन स्थानिक महिला बचतगटामार्फत करण्यात येईल. याशिवाय महामार्गावर बचतगटांना उत्पादनांची विक्री व्यवस्था करण्याचे



नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

महिला धोरणात महिलांच्या सुरक्षेला अधिक प्राधान्य देताना राज्यातील महामार्गावरील स्वच्छतागृहांची दुरवस्था दूर करण्याबाबतही अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले होते. यात प्रामुख्याने राज्यातील राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, समृद्धी महामार्गासह द्रुतगती महामार्गांवर प्रत्येक २५ किलोमीटर अंतरावर महिलांसाठी स्वच्छतागृह उभारण्याचे निश्चित करण्यात आले होते. महिला व बाल विकास विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या समन्वयातून हा प्रकल्प राबविला जाणार असल्याची माहिती मंत्री तटकरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

स्वच्छतागृहांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग करणार असून, जन सुविधा केंद्राचे व्यवस्थापन माविम स्थापित बचत गटांमार्फत करण्यात येणार आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 29/03/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# डॉ.मंदाकिनी व डॉ.प्रकाश आमटे यांना

## एआयबीडीएफ'तर्फे गोंदण पुरस्कार जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : त्वचेच्या स्वयंप्रतिकार आजारांवरील इलाजासाठी मदत करणाऱ्या ऑटो-इम्यून ब्लिस्टरिंग डिसीज फाऊंडेशनच्या (एआयबीडीएफ) वतीने थोर समाजसेवक डॉ. मंदाकिनी व डॉ. प्रकाश आमटे यांना गोंदण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तसेच आमटे दाम्पत्याच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती 'एआयबीडीएफ'चे संस्थापक अशोककुमार सुरतवाला यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी फाउंडेशनचे विश्वस्त डॉ. शरद मुतालिक, अनिरुद्ध बंबावाले, जयंत हेमाडे, विजय नांदगावकर आदी उपस्थित होते.अशोककुमार सुरतवाला म्हणाले, "ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते आमटे दाम्पत्याला यंदाचा पहिलाच 'गोंदण पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. येत्या बुधवारी (ता. २ एप्रिल २०२५) सायंकाळी ६.३० वाजता डेक्कन क्लब हाऊस, डेक्कन जिमखाना, पुणे येथे हा पुरस्कार सोहळा होणार असून, पुरस्कार प्रदान केल्यानंतर प्रसिद्ध निवेदक प्रवीण जोशी आमटे दाम्पत्याची प्रकट मुलाखत घेणार आहेत. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची विशेष उपस्थिती असणार आहे. हा कार्यक्रम फक्त निमंत्रितांसाठी आहे."डॉ. शरद मुतालिक म्हणाले, "त्वचेच्या आजारांकडे समाज आजही तुच्छतेने पाहतो. त्यामुळे अशा रुग्णांना आजारासोबत अन्य अडचणींचा सामना करावा लागतो. आर्थिक व सामाजिक संघर्षाला सामोरे जावे लागते. अशावेळी त्वचेच्या आजारांबाबत जागृती करून ऑटो-इम्यून ब्लिस्टरिंग आजारांनी ग्रस्त लोकांना मदत करण्यासाठी सुरु केलेला सामाजिक उपक्रम आहे. अशोककुमार सुरतवाला यांच्या प्रेरणेने दिवंगत जयश्री सुरतवाला यांच्या स्मरणार्थ सुरु केलेल्या फाउंडेशनमार्फत लोकांमध्ये ऑटो-इम्यून ब्लिस्टरिंग आजारांविषयी जागरूकता वाढवण्यासह लवकर निदान व योग्य उपचारांसाठी मार्गदर्शन, गरजू रुग्णांना मदत देण्यात येते. तसेच या आजारांतून बऱ्या झालेल्या रुग्णांचे अनुभव पीडितांपर्यंत पोहचवून त्यांना प्रगत उपचार घेण्यास प्रोत्साहन व मार्गदर्शन देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे. यासह आधुनिक औषधोपचार सर्वांसाठी सुलभ व परवडणारे करण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे."

# मोठी स्वप्ने पाहा, नव्या संधी शोधा - प्रल्हाद साळुंखे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



औंध : "मोठी स्वप्ने पाहा, नव्या संधी शोधा, आणि संपूर्ण जगाला दाखवून द्या की, ग्रॅज्युएशनचा सर्टिफिकेट फक्त कागदाचा तुकडा नाही, तर यशाची सुरुवात आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे माजी मुख्य अभियंता प्रल्हाद साळुंखे यांनी केले. ते रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. सदर कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ औंधचे प्रेसिडेंट राजेंद्र शेलार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, उपप्राचार्य डॉ. प्रभंजन चव्हाण, प्रा.डॉ. तानाजी हातेकर, प्रा. सुशील कुमार गुजर, डॉ. रेश्मा दिवेकर, माजी उपप्राचार्य रमेश रणदिवे, प्रा. सौरभ कदम, प्रा. सविता पाटील, प्रा. कल्पना कांबळे, प्रा. स्वाती चव्हाण आदी महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षिका, माजी विद्यार्थी, पत्रकार गजाला सय्यद, विद्यार्थी परिषद अध्यक्ष साक्षी खवळे, दीपाली पुजारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

पुढे बोलताना साळुंखे म्हणाले कि, तुम्ही आता शिक्षणाचा एक टप्पा पूर्ण केला आहे. पण हे "The End" नाही, तर "To be continued..." आहे! "ज्या दिवशी तुम्ही शिकणं थांबवाल, त्या दिवशी वाढणं थांबेल!" "शिकणे थांबवू नका, कारण आयुष्यभर शिकणारेच पुढे जातात!" तुम्ही या संस्थेचा कणा आहात. तुमच्या समर्पणाने, कौशल्याने आणि उत्कटतेने या तरुण मनांना आकार दिला आहे आणि आमची प्रतिष्ठा उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून उंचावली आहे. आज आपण जे यश साजरे करत आहोत, मग ते शैक्षणिक सन्मान असो, संशोधनातील यश असो किंवा वैयक्तिक वाढ, हे तुमच्या अथक प्रयत्नांचे प्रमाण आहे. आम्ही करिअर विकासाला प्रोत्साहन देत असताना, आम्ही तुमच्यातही गुंतवणूक करतो,प्रशिक्षण, संशोधन अनुदान आणि उद्योग नेत्यांशी सहकार्याच्या संधींद्वारे. एकत्रितपणे, आपण फक्त करिअर घडवत नाही; आपण भविष्य घडवत आहोत.

ही संस्था केवळ शिक्षणाचे ठिकाण नाही,ती यशाची उडी आहे. विद्यार्थ्यांना मी म्हणेन: मोठी स्वप्ने पाहा, कठोर परिश्रम करा आणि ही तुमच्या महानतेची पायरी बनू द्या. प्राध्यापकांना मी म्हणेन: प्रेरणा देत रहा, नवकल्पना करत रहा आणि नेतृत्व करत रहा. एकत्रितपणे, आपण या उत्कृष्टतेचा वारसा निर्माण करूया जो या भिंतींपलीकडेही गूंजेल. पुढे शेलार यांनी अध्यक्षीय भाषणात म्हंटले कि, विद्यार्थ्यांनी आपले शहर प्रदूषण मुक्त करण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करायला हवी, एक जबाबदारी घायला हवी आहे. यासाठी आम्ही रोटरी क्लबच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवित असतो, त्याकरिता विद्यार्थिनी देखील स्वतः सहभागी होऊन जबाबदारी पार पडायला हवी. तसेच या महाविद्यालयाचे विद्यार्थी नक्कीच गुणी आहेतच त्याचप्रमाणात विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात पुढे यायला हवे, रोटरी क्लबच्या माध्यमातून त्यांना सहकार्य नेहमीच करण्यात येईल. यावेळी प्राचार्य आंधळे यांनी साळुंखे यांच्या कार्याचे कौतुक करत महाविद्यालयाला त्यांच्या मार्फत होणाऱ्या सहकार्याची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, एकूण ६०० प्रमाणपत्र आज वाटप होत आहे. त्यासोबतच विविध पारितोषिके प्रदान करण्यात येत आहे. महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक आहे. आज ज्यांना पारितोषिके प्राप्त होणार आहे आणि जे सहभागी झाले आहेत अशा विद्यार्थ्यांचे अभिनंदन आहे. सदर समारंभात शैक्षणिक पारितोषिक वाचन प्रा. सुशील गुजर यांनी केले तर सांस्कृतिक पारितोषिक वाचन डॉ. रेश्मा दिवेकर यांनी केले तसेच क्रीडा पारितोषिक वाचन प्रा. सौरभ कदम यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सायली गोसावी यांनी केले तर आभार प्रभंजन चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना 'नासा', 'इस्रो' भेटीची संधी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी, तसेच संशोधन वृत्ती विकसित होण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेने विद्यार्थ्यांना अमेरिकेतील 'नासा', तसेच भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्त्रो) या अवकाश संशोधन संस्थांची भेट घडविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी आंतरविद्यापीठीय खगोल आणि खगोलभौतिकी केंद्राच्या (आयुका) सहकार्याने विद्यार्थ्यांची निवड चाचणी घेतली जाणार आहे.जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे आणि 'आयुका'चे वरिष्ठ शास्त्रज्ञ निशांत सिंग, समीर धुरडे, प्रसाद आडेकर यांच्यात नुकतीच बैठक झाली. त्यात हा उपक्रम राबविण्यासाठीच्या परीक्षा, अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी घेण्याची तयारी 'आयुका'ने दाखवली. तसेच उपक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली.

त्यानुसार जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सहावी ते आठवीच्या वर्गातील




विद्यार्थ्यांची 'नासा' आणि 'इस्रो' या संस्थांमध्ये भेटीसाठी निवड करण्यात येणार आहे.'नासा' येथील भेटीसाठी २५, तर 'इस्रो' येथील भेटीसाठी ५० विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांतील सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाईल. त्यातून प्रत्येक केंद्र शाळानिहाय दहा विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेतून गुणवत्तेनुसार दीडशे विद्यार्थ्यांची निवड करून 'आयुका'मध्ये विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन अंतिम ७५ विद्यार्थी निवडले जाणार आहेत, अशी माहिती वाघमारे यांनी दिली.

# 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वास्तविक जीवनाचे धडे



पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा प्रबोधिनी शाळेतील विद्यार्थ्यांसोबत एका मनोरंजक आणि साधेपणाच्या सत्रात, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आत्मविश्वासाने परीक्षांना कसे तोंड द्यावे, योग्य करिअर मार्ग कसा निवडावा आणि अडचणींना तोंड देताना लवचिकता कशी निर्माण करावी याबद्दल महत्त्वाचे अंतर्दृष्टी सामायिक केली. प्रसंगी पीसीएमसीच्या 'परीक्षा पे चर्चा' उपक्रमाचा समावेश होता, जो विद्यार्थ्यांना तणावमुक्त पद्धतीने येणाऱ्या परीक्षांना सामोरे जाण्यास मदत करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. पारंपारिक पद्धतीपासून दूर जांभळे पाटील यांनी व्यासपीठावर बसून न जाता थेट विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास, खेळ, वैयक्तिक आवडी आणि जीवनातील ध्येये यावर मुक्त संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पष्ट ध्येये निश्चित करण्याचे, त्यांच्या आवडींनुसार प्रामाणिकपणे काम करण्याचे आणि त्यांच्या क्षमतांवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले. "फक्त तुमचे पालक सांगतात म्हणून अभ्यास करू नका. खऱ्या आवडीने अभ्यास करा, आणि यश मिळेल," असे ते म्हणाले. या सत्रात वैयक्तिक विकासात खेळांचे महत्त्व देखील अधोरेखित करण्यात आले. "पीसीएमसी व्यावसायिक क्रीडा प्रशिक्षण, उपकरणे आणि पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी वचनबद्ध आहे. विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातील कामगिरीद्वारे शहराला राष्ट्रीय ओळख मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत," असे ते म्हणाले. या कार्यक्रमाला सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, माध्यमिक शिक्षण अधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापक जयराम वायाळ, क्रीडा प्रमुख ऋषिकांत वचकल आणि अनेक शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

मुख्याध्यापक जयराम वायाळ यांनीही राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये शाळेच्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा सादर केला.

विद्यार्थ्यांना आठवणींना उजाळा देत जांभळे पाटील यांनी नांदेडमधील त्यांच्या स्वतःच्या साधेपणाच्या सुरुवातीच्या आठवणींना उजाळा दिला. "त्या वेळी शाळेत बेंच नव्हते," असे ते म्हणाले. कला शाखेत पदवी घेतल्यानंतर, त्यांनी तीन वर्षे प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून काम केले आणि त्यानंतर त्यांच्या आईने त्यांना उच्च ध्येये गाठण्यासाठी प्रोत्साहित केले. प्रेरणा घेऊन त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली आणि अखेर प्रशासकीय सेवेत सामील झाले. "जर तुम्ही सातत्यपूर्ण प्रयत्नांनी तुमचे ध्येय गाठले तर यश निश्चितच मिळेल," असे ते म्हणाले. "विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि क्रीडा यांच्यात संतुलन साधण्यास मदत करून त्यांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. क्रीडा प्रबोधिनी शाळेच्या माध्यमातून, आम्ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकू शकतील असे खेळाडू निर्माण करण्याचा दृढनिश्चय केला आहे. आजच्या संवादामुळे आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी आणखी काय आवश्यक आहे हे समजण्यास मदत झाली आणि आम्ही त्यानुसार नियोजन करू."

— प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पीसीएमसी

"पीसीएमसीची क्रीडा प्रबोधिनी शाळा ही केवळ एक शैक्षणिक संस्था नाही - ती भविष्यातील खेळाडूंसाठी एक लाँचपॅड आहे. शिक्षण आणि क्रीडा पायाभूत सुविधांच्या योग्य मिश्रणासह, आम्ही विद्यार्थ्यांसाठी त्यांचे भविष्य घडविण्यासाठी सुवर्ण संधी निर्माण करत आहोत. अतिरिक्त आयुक्तांच्या भेटीमुळे आमच्या विद्यार्थ्यांचे मनोबल आणखी वाढले आहे."

- विजयकुमार थोरात, सहायक आयुक्त, पीसीएमसी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 29/03/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# अधिवेशनात शहराचा स्वतंत्र ठसा उमटवण्यात काही अंशी यश - आमदार अमित गोरखे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी, पुणे (दि. २८ मार्च २०२५) नुकत्याच संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान परिषदेमध्ये सदस्य म्हणून पिंपरी चिंचवड शहरासह राज्यातील विविध प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मी विविध प्रश्न उपस्थित केले. परभणी येथे चिमुकलीवर झालेले अत्याचाराला वाचा फोडून आरोपीवर पोस्को कायद्या अंतर्गत कारवाई करावी राज्य परिवहन महामंडळ बसचे विद्युतीकरण करावे अशा राज्यस्तरीय मुद्द्यांबरोबरच पिंपरी चिंचवड शहरातील स्थानिक प्रश्न देखील या अधिवेशनात मांडण्याची संधी मला मिळाली. यामध्ये पवना नदी प्रदूषण तसेच रिव्हर फ्रंट काँक्रिटीकरण, पिंपरी चिंचवड महापालिकेतील अंतर्गत रस्त्याची झालेली दुर्दशा व निकृष्ट दर्जा, पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये आयटी विभागात झालेला मोठ्या प्रमाणातील गैरव्यवहार, एमआयडीसी संभाजीनगर व शाहूनगर भागात युडीपीसीआर धोरण लागू करण्यासंदर्भात लक्षवेधी लावून तातडीने उद्योग राज्यमंत्री महोदयासोबत बैठक लावून धोरणात्मक निर्णय घेण्यास उद्युक्त केले. तसेच संविधानावरील अतिशय वैचारिक यथार्थ भाषण, मागासवर्गीय आरक्षण उपवर्गीकरण असे प्रभावी मुद्दे मांडून अधिवेशनात पिंपरी चिंचवड शहराचा स्वतंत्र ठसा उमटवण्यात काही अंशी मी यशस्वी झालो असे आमदार अमित गोरखे यांनी सांगितले. आमदार अमित गोरखे यांनी शुक्रवारी (दि.२८) चिंचवड येथे अर्थसंकल्पीय अधिवेशनाची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ नेते सदाशिव खाडे, भाजपा महिला शहराध्यक्ष सुजाता पालांडे, शहर सरचिटणीस राजू दुर्गे, विजय उर्फ शितल शिंदे, माजी नगरसेवक संदीप वाघेरे, ज्येष्ठ नेते राजेंद्र बाबर, भाजपा शहर कार्यकारणी सदस्य नेताजी शिंदे, युवा कार्यकर्ते बाळा शिंदे, गणेश लंगोटे आदी उपस्थित होते. आ. अमित गोरखे यांनी भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त"संविधान गौरव" चर्चेदरम्यान विधान परिषदेमध्ये काही मुद्दे मांडले.आपल्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाली! २६ जानेवारी १९५० रोजी लागू झालेले हे संविधान समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यांचे प्रतीक आहे. उद्देशपत्रिका ही संविधानाची गुरुकिल्ली आहे. प्रत्येक नागरिकाचा हक्क अबाधित राहावा यासाठी संविधान हे भक्कमपणे नागरिकाच्या हक्कांचे रक्षण करते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दूरदर्शी विचार आजही आपल्याला मार्गदर्शन करतात. संविधानामुळेच देशात लोकशाही टिकली आहे आणि संधींची दारे सर्वांसाठी खुली झाली आहेत. पर्यावरण विषयक चर्चेत भाग घेताना नदी वाचवा, निसर्ग जगवा ! पिंपरी-चिंचवड, पवना आणि मुळा नदी किनारी सिमेंटच्या अवाढव्य बांधकामाला स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमी विरोध करत आहेत. नैसर्गिक जैवविविधता नष्ट होत असून झाडांची कत्तल सुरू आहे, त्यामुळे प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अशी मागणी आहे. "कॅन्सर ट्रीटमेंट करा, पण ब्युटी ट्रीटमेंट नको!" असा संदेश देत नागरिकांनी RTF विरोधात आवाज उठवला. "River Pollution से डर नही लगता, Riverfront Development से डर लगता है!" हा जनआवाज बनत विधान मंडळामध्ये फलकाद्वारे लक्ष वेधून नद्यांचा निसर्गरम्य विकास व्हावा, अशी मागणी आ. अमित गोरखे यांनी केली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पिंपरी चिंचवड शहरातील छत्रपती संभाजी नगर शाहू नगर औद्योगिक विभागातील रहिवासी विभागाला महापालिकेच्या धर्तीवरती यु डी पी सी आर लागू करा अशी लक्षवेधीद्वारे सभागृहात मागणी केली.

# महानगरपालिका सेवेतून पाच अधिकाऱ्यांसमवेत 27 जण सेवानिवृत्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : सेवानिवृत्त होणा-या अधिकारी,कर्मचा-यांनी अनेक वर्षांपासून महापालिकेने सोपविलेली कामे व जबाबदा-या प्रामाणिकपणे पार पाडत उत्तम कामकाज केले आहे. यासारख्या अधिकारी,कर्मचा-यांमुळे महापालिकेस ई गव्हर्नन्स, राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता स्पर्धा अशा विविध क्षेत्रात प्रथम क्रमांकांचे पुरस्कार मिळत आहेत असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले आणि सेवानिवृत्तांप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.

पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील मधुकर पवळे सभागृह येथे माहे मार्च २०२५ अखेर नियमित वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या २१ आणि स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या ६ अशा एकुण २७ कर्मचा-यांचा आज अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन देताना ते बोलत होते. या कार्यक्रमास मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण,यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.राजेंद्र वाबळे,उप आयुक्त मनोज लोणकर,मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, लेखाधिकारी चारूशीला जोशी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक,विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते. नियमित वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले, कार्यकारी अभियंता अनुश्री कुंभार, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. मेधा खरात, मुख्याध्यापक महिपती पाटील, मुख्य लिपीक मनोजकुमार खोपडे, सिस्टर इन्चार्ज अंजली आपटे, बी.सी.जी टेक्निशियन भास्कर ढोरे, ऑपरेटर अशोक चव्हाण, बाळासाहेब मालुसरे, उपशिक्षक विजया सोनटक्के, पौर्णिमा देवरे, रसिका देव, वीजतंत्री देविदास महाजन, रखवालदार वसंत चिमटे, वॉर्डबॉय किशोर राजमाने, तुकाराम लांडगे, शिपाई कृष्णा पाटील, मजूर आसफखॉ पठाण, राजू काळभोर, माळी सुनिल गाटे, सफाई कामगार नंदा गंगावणे आदींचा समावेश आहे.

तर स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये माहिती व तंत्रज्ञान अधिकारी अनिता कोटलवार, सहाय्यक उद्यान निरीक्षक संदीप गायकवाड, उपशिक्षक अंजली देवडकर, मुकादम कैलास कांबळे, अशोक सोनटक्के, सफाई सेवक गोपाळ सुर्यवंशी यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले. तर सुत्रसंचालन आणि आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968